**Deputy Superintendent of Police, ACB, Nandurbar**
पोलीस उपअधीक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, नंदुरबार
१२, जयचंद नगर, कोरीट रोड, नंदुरबार, ता.जि. नंदुरबार–४२५४१२
☎ (०२५६४) २३०००९
✉dyspacbnandurbar@gmail.com

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

दिनांक ०२/०३/२०२३.

## :-प्रेस नोट :-

**आलोसे श्री. महेश प्रतापराव पाटील, वय-५१ वर्षे, व्यवसाय-कार्यकारी अभियंता (वर्ग १), सार्वजनिक बांधकाम विभाग, शहादा जि.नंदुरबार मुळ रा. फ्लॅट २०३, अष्टविनायक टॉवर, थत्ते नगर, गंगापुर रोड, नाशिक यांनी वेळोवेळी ४३,००,०००/- रुपये लाचेची मागणी करुन एकुण मागणी केलेल्या रकमेपैकी आज रोजी लाचेची रक्कम ३,५०,०००/- रुपये स्विकारतांना पंचासमक्ष रंगेहात पकडले बाबत...**

| | |
|---|---|
| **घटक** | **नंदुरबार** |
| **गुन्हा नोंद कमांक** | कार्यवाही सुरु आहे. |
| **कलम** | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७ प्रमाणे |
| **आरोपीचे नाव व कार्यालय** | आलोसे श्री. महेश प्रतापराव पाटील, वय-५१ वर्षे, व्यवसाय-कार्यकारी अभियंता (वर्ग १), सार्वजनिक बांधकाम विभाग, शहादा जि.नंदुरबार मुळ रा. फ्लॅट २०३, अष्टविनायक टॉवर, थत्ते नगर, गंगापुर रोड, नाशिक |
| **वेळोवेळी एकुण मागणी केलेली लाचेची रक्कम** | **४३,००,०००/- रुपये (त्रेचाळीस लाख रुपये)** |
| **एकुण मागणी केलेल्या रकमेपैकी आज रोजी स्विकारलेली लाचेची रक्कम** | **३,५०,०००/- रुपये (तीन लाख पन्नास हजार रुपये)** |
| **थोडक्यात माहिती** | यातील तक्रारदार हे शासकीय नोंदणीकृत बांधकाम ठेकेदार आहेत. तक्रारदार यांनी मागील सहा महिने ते एक वर्षाच्या कालावधीत नंदुरबार जिल्हयात प्रमुख जिल्हा मार्ग, प्रमुख राज्य मार्ग अशा विविध रस्त्यांच्या नवीन डांबरीकरणाची व डागडुगीची कामे पुर्ण केली आहेत. तसेच सध्याच्या कालावधीत तक्रारदार यांचे तीन नवीन कामांच्या निवीदा मंजुर होवुन सार्वजनिक बांधकाम विभाग, धुळे या कार्यालयाकडुन कार्यकारी अभियंता सा.बां.वि.शहादा या कार्यालयात आल्या आहेत. परंतु नमुद तिन्ही कामांचे कार्यारंभ आदेश आज रोजी पावेतो तक्रारदार यांना मिळालेले नाहीत.<br>तक्रारदार यांनी पुर्ण केलेल्या कामांबाबतची ३,९२,७९,२८५/- रुपये (तीन कोटी ब्यानऊ लाख एकोणांशी हजार दोनशे पंच्यांशी रुपये) एवढी बिलाची प्रलंबित रक्कम व या व्यतिरिक्त प्रस्तावित असलेल्या तीन कामांबाबतचे ५,३३,०००,००/- रुपये (पाच कोटी तेहतीस लाख रुपये) एवढया रकमेचे कार्यारंभ आदेश मिळणेकामी आलोसे श्री. महेश प्रतापराव पाटील, वय-५१ वर्षे, व्यवसाय-कार्यकारी अभियंता (वर्ग १), सार्वजनिक बांधकाम विभाग, शहादा जि.नंदुरबार यांच्याकडे वेळोवेळी पाठपुरावा केला व पुर्ण केलेल्या कामांबाबतची बिलाची प्रलंबित रक्कम व तीन कामांचे कार्यारंभ आदेश मिळणेबाबत अनेक वेळा विनंती केली. परंतु आलोसे श्री. महेश प्रतापराव पाटील, कार्यकारी अभियंता (वर्ग १), सार्वजनिक बांधकाम विभाग, शहादा जि.नंदुरबार यांनी तक्रारदार यांच्या पुर्ण केलेल्या कामांची प्रलंबित बिलाची रक्कम मंजुर केली नाही. तसेच |

| | |
|---|---|
| | कार्यारंभ आदेश सुध्दा दिले नाहीत. यानंतर तक्रारदार यांनी विनंती व पाठपुरावा केला असता आलोसे श्री. महेश प्रतापराव पाटील, कार्यकारी अभियंता (वर्ग १), सार्वजनिक बांधकाम विभाग, शहादा यांनी तक्रारदार यांनी पुर्ण केलेल्या कामांची बिले काढण्यासाठी वेळोवेळी दहा टक्के व तिन्ही कार्यारंभ आदेश देण्यासाठी पाऊण टक्का अशा टक्केवारी स्वरूपात एकत्रीत रक्कम ४३,००,०००/- रुपये (त्रेचाळीस लाख रुपये) एवढया लाचेच्या रकमेची मागणी केली.<br>नमुद लाचेची रक्कम तक्रारदार यांना देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी दिनांक ०२/०३/२०२३ रोजी याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दिली. नमुद तक्रारीच्या अनुषंगाने पंचांसमक्ष केलेल्या पडताळणी व सापळा कारवाईत आलोसे यांनी तक्रारदार यांच्या सोबत सांकेतीक शब्दात बोलुन प्रथमतः तक्रारदार यांना कार्यारंभ आदेश देण्याच्या मोबदल्यात ३,५०,०००/- रुपये (तीन लाख पन्नास हजार रुपये) आलोसे श्री. महेश पाटील यांना त्यांच्या शहादा येथील शासकीय निवासस्थानी तक्रारदार यांच्याकडुन पंचांसमक्ष स्विकारतांना रंगेहाथ पकडण्यात आले आहे. सदर बाबत शहादा पोलीस स्टेशन जिल्हा नंदुरबार येथे गुन्हा दाखल करण्याची कारवाई चालु आहे. |
| **कामगिरी पथक** | सदर कामगिरी पोलीस उपअधीक्षक, श्री.राकेश आनंदराव चौधरी,लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,नंदुरबार पोलीस निरीक्षक, श्री. समाधान वाघ, श्रीमती.माधवी एस.वाघ, पोहवा/विलास पाटील, पोहवा/विजय ठाकरे, पोना/अमोल मराठे, पोना/संदीप नावाडेकर, पोना/देवराम गावीत, मपोना/ज्योती पाटील, पोना/मनोज अहिरे व चापोना/जितेन्द्र महाले अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, नंदुरबार पथकाने केली आहे. |

लाचलुचपत विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबाबत तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नंदुरबार कार्यालयास संपर्क करावा.

संपर्क पत्ता : ला.प्र.वि.नंदुरबार कार्यालय
संकेतस्थळ : acbnandurbar@gmail.com
ई-मेल : dyspacbnandurbar@mahapolice.gov.in
ऑनलाईन तक्रार/ॲप्लीकेशन : acbnandurbar@gmail.com
टोल फ्री क्रमांक : १०६४
दुरध्वनी क्रमांक : ०२५६४- २३०००९,२३१००९

(राकेश आनंदराव चौधरी)
पोलीस उप अधीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,नंदुरबार

Scanned with CamScanner